| | |
|---|---|
| MHYA100007312025 | दाखल तारीख – १६.०४.२०२५ |
| | नोंदणी तारीख – १६.०४.२०२५ |
| | निकाल तारीख – २९.०७.२०२६ |
| | कालावधी – ०१ व. ०३ म. १३ दि. |

**नियमीत फौजदारी प्रकरण क्रमांक १७०/२०२५ निशाणी क्र. ३५**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.०३ केळापुर यांचे न्यायालय**

(पिठासन अधिकारी– सायमा एन.ए.एस.शेख यांचे समक्ष)

**न्यायनिर्णय**

(दिनांक २९ जुलै, २०२६ रोजी पारीत)

**नियमीत फौजदारी प्रकरण क्रमांक १७०/२०२५**

**गुन्हा नोंदणी क्रमांक १३३/२०२५, पो.स्टे. पांढरकवडा**

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष....** | | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन, पांढरकवडा,<br>ता. केळापुर, जि. यवतमाळ |
| **अभियोगपक्षातर्फे अभियोक्ता** | | श्री. पी. एस. सरोदे, |
| | | **..विरुध्द ...** |
| **आरोपी....** | १. | **प्रणित उर्फ प्रजय प्रकाष खडसे,**<br>वय ३७ वर्षे, धंदा – मजुरी, |

| | | |
|---|---|---|
| | २. | **प्रकाष तुळसिराम खडसे,**<br>वय ६७ वर्षे, धंदा – मजुरी, |
| | ३. | **प्रणव प्रकाष खडसे,**<br>वय ३३ वर्षे, धंदा – मजुरी, |
| | ४. | **सौ. सुमती प्रकाष खडसे,**<br>वय ४२ वर्षे, धंदा – मजुरी,<br>**चौघेही रा. बोथ ता. केळापूर जि. यवतमाळ.** |
| **आरोपींतर्फे विधज्ञ ....** | | **आरोपीतर्फे श्री. व्ही.व्हाय. भगत,** |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १२.०२.२०२५ |
| गुन्हा नोंद केल्याची तारीख | १२.०२.२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याची तारीख | १६.०४.२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल ठेवल्याची तारीख | ०५.०२.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २१.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी ठेवल्याची तारीख | -- |
| न्यायनिर्णयाची तारीख | २९.०७.२०२६ |
| शिक्षा सुनावली असल्यास, त्याची तारीख | लागू नाही. |

**<u>आरोपींचा तपशील</u>**

| अ. क्र. | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनावर मुक्त केल्याची तारीख | दोषारोपाचे कलम | निर्दोष की दोषी | सुनावणयात आलेल | वजावट कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ी<br>शिक्षा | |
| १.<br>२.<br>३.<br>४. | **प्रणित उर्फ प्रजय प्रकाष खडसे**<br>**प्रकाष तुळसिराम खडसे**<br>**प्रणव प्रकाष खडसे**<br>**सौ. सुमती प्रकाष खडसे** | सुचनापत्रावर सोडयात आले. | १७.०४.२०२५ | भा. न्या. सं. चे कलम ११८(१), ११५, ३५२, ३५१(२), ३५१(३) व ३(५) | निर्दोष | ... | --- |

## अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी

| अं. क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र.१ | सौ. गायत्री अरविंद खडसे | फिर्यादी |
| अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र.२ | अरविंद शामराव खडसे | साक्षीदार |
| अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र.३ | वैभव अरविंद खडसे | साक्षीदार |
| अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र.४ | तेजस उर्फ अजय अरविंद खडसे | साक्षीदार |

## बचावपक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी

| अं. क्र. | नांव | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## न्यायालयातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी

| अं. क्र. | नांव | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**अभियोग पक्षातर्फे निशाणी क्रमांक देण्यात आलेल्या कागदपत्रंची यादी**

| अं.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | नि. क्र. ३० | जबाणी रिपोर्ट |
| २. | नि.क्र. ३१ | छा.प्र.खबर |

**बचावपक्षातर्फे मान्य केलेल्या कागदपत्रांची यादी**

| अं. क्र. | नि.क्र. | कादपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**मटेरीयल ऑब्जेक्टस / महत्वाच्या वस्तू**

| अं. क्र. | महत्वाच्या वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ओ.पी.क्र. २२/२६ | एक वेळवाची काठी |

## न्या य नि र्ण य

(दिनांक – २९ जुलै, २०२६)

आरोपींवर सदरचा खटला भारतीय न्याय संहिताचे कलम ११८(१),११५, ३५२, ३५१(२), ३५१(३) व ३(५) अन्वये चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे म्हणणे थोडक्यात खालील प्रमाणे नमूद करता येईल :**

**२)** घटना दिनांक १२/०२/२०२५ रोजी सकाळी ०९.०० वाजताच्या दरम्यान ग्राम बोथ येथे घडली होती. त्यावेळी फिर्यादी व तिचे पती हे त्यांचे घराचे बांधकाम करीत असतांना आरोपी यांनी त्यांना आमच्या जागेवर बांधकाम का करीत आहे असे

म्हणूण आरोपी क्र. १ यांनी फिर्यादीस लाकडी काठीने मारहाण केली. तसेच आरोपी क्र. २ यांनी फिर्यादीच्या पतीस व मुलास व आरोप क्र. ४ यांनी फिर्यादीस लाथाबुक्याने मारहाण केली. तसेच सर्व आरोपींनी फिर्यादी, पती, मुलास शिवीगाळ करुण जिवे मारण्याची धमकी दिली. म्हणून प्रस्तूतची फिर्याद दाखल झालेली आहे.

**३)** सदर खटल्यातील आरोपपत्राचे अवलोकन केल्यानंतर, आरोपीविरुध्द दोषात्मक बाबी आढळुन आल्याकारणाने, आरोपीविरुध्द भारतीय न्याय संहिताचे कलम ११८(१),११५, ३५२, ३५१(२), ३५१(३) व ३(५) अन्वये निशाणी क्रमांक २० प्रमाणे दोषारोप निश्चित केले. वरील सर्व आरोप आरोपींना त्याच्या मातृभाषेत समजावून सांगितले असता, आरोपींनी सर्व आरोप नाकारले व सदरचा खटला चालविण्यात यावा अशी विनंती केली.

४) सदर खटला अभियोगपक्षाच्या पुराव्याकामी असताना, फिर्यादी यांनी नि. क्र. २६ वर अर्ज दाखल करुन त्यांच्या वतीने सहायक सरकारी अभियोक्ता म्हणून श्री. पी. आर. बोंतावार यांना नियुक्ती करण्याची परवाणगी मागीतली. तसेच सर्व आरोपींनी व फिर्यादी यांचे न्यायालयाबाहेर आपसी झाल्याबातची पुरसीस निशाणी क्रमांक २८ वर दाखल दाखल करुण सर्व आरोपींनी व फिर्यादी यांची न्यायालयाबाहेर तडजोड झालेली असून त्यांचा आता वाद राहीला नसल्याचे कथन केले आहे.

५) सदरच्या खटल्यात अभियोग पक्षातर्फे केवळ चार साक्षीदार तपासण्यात आले. फिर्यादी साक्षीदार नामे – गायत्री अरविंद खडसे यांनी त्यांची साक्ष साक्षीदार क्रमांक ०१ म्हणुन निशाणी क्रमांक २९ वर, साक्षीदार क्र. २ अरविंद शामराव खडसे यांनी साक्ष नि.क्र. ३२, साक्षीदार क्र. ३ वैभव अरविंद खडसे यांची साक्ष नि.क्र.३३ व साक्षीदार क्र. ४ अजय अरविंद खडसे यांची साक्ष नि.क्र. ३४ अन्वये नोंदविण्यात

आली. सदर फिर्यादी तसेच ईतर सर्व साक्षीदार यांनी आरोपीविरुध्द काहीही दोषात्मक सांगितले नाही. तसेच सहायक अभियोक्ता यांनी त्यांची बाजू बंद केली व यापूढे साक्षीदार तपासवायचे नसल्याचे कथन केले. फिर्यादी तसेच ईतर साक्षीदार यांचे पुराव्याचे अवलोकनावरुण प्रस्तुत खटल्यात आरोपीविरुध्द दोषात्मक पुरावा दिसुन आला नसल्यामुळे, आरोपीची भारतीय नागरीक सुरक्षा संहीता, २०२३ चे कलम ३५१ ची जबाणी वगळण्यात आली.

६) अभियोग पक्षाचे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.पी. एस. सरोदे व श्री. पी. आर. बोंतावार आरोपींतर्फे श्री. व्ही. व्हाय. भगत यांचा युक्तीवाद ऐकला. सदर खटल्यात नमूद असलेल्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता, खालील मुद्दे माझे विचाराधीन उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष मी कारणमीमांसेसहित खालील प्रमाणे नमुद करीत आहे.

| अ.क्र. | मूद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, दिनांक १२/०२/२०२५ रोजी सकाळी ०९.०० वाजेच्या सुमारास मौजा. बोथ येथे आरोपी क्र. १ यांनी ईतर आरोपींसोबत संगणमत करुण फिर्यादीस ईच्छेपूर्वक काठीणे मारहाण करुण जखमी केले व त्याद्वारे भारतीय न्याय संहिताचे कलम ११८(१), सह कलम ३(५) अन्वये गुन्हा केला आहे काय ? | **नकारार्थी** |
| २) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी संगणमताने फिर्यादी व | |

| | | |
|---|---|---|
| | तिच्या पतीस ईच्छपूर्वक लाथाबुक्याने मारहाण केली व त्याद्वारे भारतीय न्याय संहिताचे कलम ११५ सह कलम ३(५) अन्वये गुन्हा केला आहे काय ? | **नकारार्थी** |
| ३) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी संगणमताने फिर्यादीस व तिच्या पतीस जाणीपूर्वक शारिरीक दुखावत पोहचविली व त्याद्वारे भारतीय न्याय संहिताचे कलम ३५२ सह कलम ३(५) अन्वये गुन्हा केला आहे काय ? | **नकारार्थी** |
| ४) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी, सर्व आरोपींनी संगणमताने मारहाण करुण जिवे मारण्याची धमकी दिली व त्याद्वारे भारतीय न्याय संहिताचे कलम ३५१(२)(३) सह कलम ३(५) अन्वये गुन्हा केला आहे काय ? | **नकारार्थी** |
| ५) | काय आदेश? | **अंतिम आदेशा प्रमाणे** |

::**कारणमीमांसा** ::

**मूद्दा क्रमांक १ व ४ करीता :–**

७) सदरील खटल्यातील नमूद पुराव्याच्या गुणवत्तेनुसार सारांशा करीता वरील सर्व मुद्दे एकत्रीतरीत्या विचारात घेण्यात येत आहे.

८) भारतीय न्याय संहिताचे कलम ११८(१),११५, ३५२, ३५१(२),

३५१(३) व  ३(५) अन्वये दोषारोप सिध्द करण्यासाठी घटनेच्या दिवशी फिर्यादी व तिचे पती हे त्यांचे घराचे बांधकाम करीत असतांना आरोपी यांनी त्यांना आमच्या जागेवर बांधकाम का करीत आहे असे म्हणूण आरोपी क्र. १ यांनी फिर्यादीस लाकडी काठीने मारहाण केली. तसेच आरोपी क्र. २ यांनी फिर्यादीच्या पतीस व मुलास व आरोप क्र. ४ यांनी फिर्यादीस लाथाबुक्याने मारहाण केली. तसेच सर्व आरोपींनी फिर्यादी, पती, मुलास शिवीगाळ करुण जिवे मारण्याची धमकी दिल्याचे अभियोग पक्षातर्फे संशया पलीकडे सिध्द करणे आवश्यक आहे. उपरोक्त कायदेशीर तरतुदींचा विचार करुन उपलब्ध पुराव्याचे विवेचन करणे आवश्यक आहे.

९)        प्रस्तुत खटल्यातील प्रमुख पिडीत साक्षीदार क्र.१ फिर्यादी नामे–गायत्री अरविंद खडसे  यांनी निशाणी क्र. २९ वरील तोंडी पुराव्यात असे नमुद केले आहे की, ती सर्व आरोपींना ओळखत असून ते त्यांचे नातेवाईक आहे. तसेच घटनेच्या दिवशी त्यांचा आरोपी सोबत शाब्दीक वादविवाद झाला होता. त्यामुळे त्यांनी रागाच्या भरात आरोपी विरुध्द फिर्याद दाखल केली. तसेच त्यांनी दिलेल्या जबाणी रिपोर्ट मधील मजकुर माहीत नसल्याचे त्यांनी त्यांच्या पुराव्यात सांगीतलेले आहे व सही व्यक्तीरीक्त इतर मजकुर त्यांनी नाकारला.

१०)       तसेच साक्षीदार क्र. २ अरविंद शामराव खडसे यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, आरोपी सोबत त्यांचे शाब्दीक वाद झाल्यामुळे त्यांच्या पत्नीने रागाच्या भरात फिर्यादी दाखल केली आहे. तसेच सा.क्र. ३ व ४ यांनी सुध्दा आरोपी सोबत बोलाचाली झाल्यामुळे त्यांच्या आईनी आरोपी विरुध्द फिर्याद दाखल केल्याचे सांगीतलेले व अभियोग पक्षाने विचारलेली विचारलेली ईतर उत्तर सुचक प्रश्न नाकारली. सदर फिर्यादी व ईतर साक्षीदार यांनी आरोपी विरुध्द काहीही

सांगीतले नसल्यामुळे व अभियोग पक्षास सहकार्य न केल्यामुळे घटना सिध्द झाली नाही. तसेच फिर्यादीनी आरोपींसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झालेली असल्याची नि.क्र. २८ पुरसीस दाखल केली आहे. यावरुण असा निष्कर्ष निघतो की, घटना हि बनावट असुन घटना ही घडलीच नाही.

**११)** एकंदरीत सदर खटल्यातील फिर्यादी यांनी त्यांच्या उपरोक्त पुराव्यात आरोपीविरुध्द दोषात्मक सांगितलेले नसल्यामुळे व त्यांचे आपसात तडजोड झालेली आहे असे पुरसिस नुसार दिसुन येते. त्यामुळे घटना सिध्द होउ शकली नाही. तसेच फिर्यादी व आरोपी यांनी नि.क्र. २८ नुसार पुरसिस दाखल केल्यामुळे सदर फिर्याद मधील मजकुर सिध्द होत नाही. म्हणुन घटनेच्या दिवशी आरोपींनी फिर्यादीस तिच्या पतीस व मुलास लाकडी काठीने मारहाण करुण जिवे मारण्याची धमकी दिल्याचे सिध्द होत नाही. म्हणून **मुद्या क्रमांक १ व ४ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवित आहे.**

**मुद्या क्रमांक ५ करीता :-**

**१२)** सदरील मुद्याच्या निष्कर्षासाठी मी खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करत आहे.

## // आ दे श //

१) आरोपी क्र. ०१. प्रणित उर्फ प्रजय प्रकाष खडसे, ०२. प्रकाष तुळसिराम खडसे,०३. प्रणव प्रकाष खडसे व ०४. सौ. सुमती प्रकाष खडसे यांची भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१ (१) अन्वये भारतीय न्याय संहिताचे कलम

११८(१), ११५, ३५२, ३५१(२), ३५१(३) व ३(५) या दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपींनी पूर्वी दाखल केलेले जातमुचलके व जामीनकदबे पूढील सहा महीण्यांकरीता कायम ठेवण्यात येते.

३) भारतीया नागरीक सुरक्षा संहीता, २०२३ चे कलम ४८१ (१) च्या पुर्ततेकरीता आरोपी कडूण प्रत्येकी रक्कम रुपये १५०००/– चे जामीनपत्र व जातमुचलका स्वीकारुण पुर्तता करण्यात आली. सदर जामीनपत्र व जातमुचलका पुढील सहा महीण्यांकरीता वैध्य राहील.

४) सदरील खटल्यात जप्त मुद्देमाल रेजरपत्ती ही मुल्यहीन असल्यामुळे, अपील कालावधी संपल्यानंतर ते नष्ट करण्यात यावे.

५) आरोपींना लगेचचं सदर दोषारोपातून मुक्त करण्यात येते.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात श्रुतलेखीत व उदघोषीत करण्यात येतो.)

स्वा/–

दिनांक :– २९ जुलै, २०२६

ठिकाण :– केळापुर.

**(सायमा एन.ए.एस.शेख)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्रमांक–३, केळापूर.